कृषि विभागांतर्गत शेती सल्ला, प्रशिक्षण, निर्यात वाढ इत्यादी बाबीसंदर्भात सल्ला देण्यासाठी नियुक्त केलेल्या एक सदस्यीय अभ्यास समितीस दोन महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०५४(११)/२४/२०२५-MAG-८A(E-११०९७०७)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- १० एप्रिल, २०२६

**वाचा :**

१) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. कृव्यप्र ४६१९/प्र.क्र. ७०/८ अे, दि. ११/०९/२०१९

२) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०५४(११)/२४/२०२५-MAG-८A (E-११०९७०७), दि. ०२.०६.२०२५

**प्रस्तावना :-**

राज्यात जागतिक बँक अर्थसहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ११.९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. "राज्यातील अल्पभूधारक शेतकरी आणि कृषि नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक शेतमाल मूल्यसाखळयांच्या विकासाला मदत करणे" हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्या मधील घटक "अ" अंतर्गत कृषि परिवर्तनाला पाठबळ देण्यासाठी संस्थात्मक संरचना मजबूत करण्याच्या बाबींचा समावेश आहे. त्यामध्ये कृषि विभागाची पुर्नरचना व सक्षमीकरण, विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची क्षमता बांधणी विकसित करणे व शेतकऱ्यांना तांत्रिक सहाय्य करणे, मूल्यसाखळीवर्धन करणे या उपघटकांचा समावेश आहे. यानुषंगाने या घटक/उपघटकांतर्गत कृषि विषयक सल्ला/मार्गदर्शन, प्रशिक्षण, तंत्रज्ञानाबाबतची माहिती याबाबत अभ्यास करण्यासाठी संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये श्री. उमेशचंद्र सारंगी (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांची एक सदस्यीय अभ्यास समिती स्थापन करण्यात आली होती. त्यानुसार समितीने दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आपला अहवाल सादर करणे अपेक्षित होते. तथापि, सदर समितीने त्यांचा अहवाल दि.१० डिसेंबर, २०२५ रोजी सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी सदर एक सदस्यीय समितीवर सोपविलेल्या कामाची व्याप्ती खूप मोठी होती व त्यासाठी केवळ एकाच व्यक्तीची नियुक्ती केली असल्यामुळे अहवाल सादर करण्यास दोन महिन्यांचा विलंब झाला असल्याची बाब त्यांनी त्यांच्या दि. ८.०१.२०२६ च्या ई मेल संदेशान्वये शासनाच्या निदर्शनास आणून, सदर समितीस दोन महिन्यांची मुदतवाढ तसेच मानधनवाढ देण्याची विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने समितीस २ महिन्यांची मुदतवाढ देऊन त्यानुषंगाने मानधन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील शेतकऱ्यांना कृषि विषयक सल्ला/मार्गदर्शन, प्रशिक्षण, तंत्रज्ञानाबाबतची माहिती, निर्यात वाढ, कृषी संबंधी विविध योजना, कार्यक्रम, उपक्रम, नियोजन, निर्यात वाढ, हवामान बदल इत्यादी बाबीसंदर्भात अभ्यास करण्यासाठी दिनांक ०२.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या श्री. उमेशचंद्र सारंगी, (सेवानिवृत्त भाप्रसे) यांच्या "एक सदस्यीय" अभ्यास समितीस २ महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. श्री. सारंगी यांना सदर समितीच्या संपूर्ण कालावधीत (६ महिने) एकुण रु.९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख फक्त) इतके मानधन देय राहील.

४. सदरचा खर्च मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत घटक 'अ' अंतर्गत प्राप्त निधीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतसथळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४१०१५३७१०४६०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकन करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.04.10 15:38:03 +05'30'

**(ग.सं.कचरे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शि., क्रिडा व अल्पसंख्यांक) महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (कृषि) /राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
११) प्रकल्प संचालक, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), पुणे
१२) श्री. उमेशचंद्र सारंगी, सेवानिवृत्त भा.प्र.से.
१३) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
१४) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
१५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१७) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१८) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१९) निवडनस्ती